पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 15/03/2019 (शुक्रवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 03 कि. मी. अंतरावर सातगाव शिवार डाबंरी रोड येथे दिनांक 01/03/2019 चे 14:30 वा. ते 14.40 वा. दरम्यान एमएच– 40/बी. यु.– 5942 क्रमांकाचा मोटरसायकलचा चालक आरोपी नामे– अनिकेत दिलीप परसाळे, रा. बोरखेडी फाटा, ता. जि. नागपूर हा त्याच्या मित्र नामे– अजय शिवदयाल मेश्राम, वय 17 वर्ष याच्या सोबत दुचाकीने जात होता. दरम्यान आरोपीने रस्त्याने जात असतांना स्वतःचे मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने डांगरी रस्त्यावरवर स्लिप होवून खाली उभा असेलेल्या आयसर गाडीवर दोघही आदळल्यानंतर ते गंभीर जखमी झाले. उपचार दरम्यान दि. 07/03/2019 रोजी अजय मेश्राम याचा मेडीकल कॉलेज नागपूर येथे मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रीकांत विजय गिरसावळे, वय 27 वर्ष, रा. रिधोरा सातगाव यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. तसेच सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास परिपोलीस उपनिरीक्षक श्री. मनोज मेश्राम हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. कुही :– अंर्तगत 18 कि. मी. अंतरावर मौजा कुचाडी येथे दि. 13/03/2019 चे 18:30 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– सुनिल सागर मडके, वय 18 वर्ष, रा. कुचाडी व आरोपी नामे– 1) विनोद मेश्राम, 2) संजय मेश्राम दोन्ही, रा. कुचाडी हे एकाच गावाचे राहतात. फिर्यादी हे घरी हजर असतांना अज्ञात कारणातून आरोपी क्र. 1) विनोद मेश्राम येवून शिवीगाळ करू लागला. यानंतर आरोपी क्र. 1 हा घरी निघुन गेला व थेडया वेळाने आरोपी क्र. 2) संयज मेश्राम, दोन्ही रा. कुचाडी सोबत येवुन फिर्यादी सोबत झगडा भांडण शिवीगाळ करीत फिर्यादीचे हातबुक्कीने व कुऱ्हाडीने मारहाण करून जखमी केले. तसेच जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 325, 504, 506, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार झाडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर